शनिवार दिनांक ०५/१२/२०१५ रोजी सकाळी ०१.०० वाजता बांधकाम समिती सभागृह जि.प.सातारा येथे झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित असलेल्या सभासदाची नावे | |
|---|---|---|
| शनिवार दिनांक ०५/१२/२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता | १) मा.श्री.साळुंखे प्रदीप उर्फ रवि सुर्यकांत | सभापती |
| | २) मा.श्री.भोसले राजू अनिल | सदस्य |
| | ३) मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र | सदस्या |
| | ४) मा.श्री.कदम राहूल बबनराव | सदस्य |
| | ५) मा.श्री.पवार शशिकात निवृत्ती | सदस्य |
| | ६) मा.श्री.जाधव सदाशिव यशवंत | सदस्य |
| | ७) मा.सौ.घाडगे सावित्रा मानाजी | सदस्या |
| | ८) मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर | सदस्या |
| | ९) मा.श्री.जयवंत दिनकर जगताप | सदस्य |

सर्व संबधितांचे उपस्थितीमध्ये मा.सभापती बांधकाम समिती जिल्हा परिषद सातारा यांचे परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

विषय क्रं.१ :- दिनांक ०७.११.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्रं.२२१ :- दिनांक ०७.११.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेत आला.

सूचक :- मा.सौ.राधाबाई दिनकर शिंदे
अनुमोदकः- मा.सौ.सुरेखा महेंद्र पाटील

**ठराव सर्वानुमते मंजूर**

विषय क्रं.२ :- विविध योजनांच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणे.

ठराव क्रं. २२२ :- विविध योजनेच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणेत आला. तसेच कामे मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने उप अभियंता यांना आवश्यक त्या सूचना देणेत आल्या.

सूचक :- मा.श्री.राजु अनिल भोसले
अनुमोदक :- मा.सौ.सुरेखा महेंद्र पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.३ :- कापडगांव चव्हाणवाडी ते तरडगांव रस्ता ग्रामा २९३ सुधारणा करणे सा.क्र.०/००० ते ३/०० ता.फलटण या कामाची निविदा स्विकृतीस मंजुरी देणे बाबत विचार करणे.

ठराव क्रं. २२३ :- १३ व्या केंद्रीय वित्त आयोगाअंतर्गत रस्ते दुरुस्ती ३०५४ लेखाशिर्षाखाली कापडगांव चव्हाणवाडी ते तरडगांव रस्ता ग्रामा २९३ सुधारणा करणे सा.क्र.०/०० ते ३/०० ता.फलटण रकम रुपये ३०.०० लक्ष प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता ३०.०० लक्ष ची निविदा या http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर दिनांक ११/८/२०१५ ते २५/८/२०१५ या कालावधीत पहिली वेळ प्रसिध्द करणेत आली होती. सदर कामाचा दराचा दुसरा लखोटा ५/९/२०१५ रोजी उघडला असता श्री.ललितकुमार आपासाहेब करचे जि.सातारा यांची अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा

(-२८.५५) टक्के कमी दराने परंतु तुलनेने सर्वात कमी दराची प्राप्त झाली. श्री.ललितकुमा आपासाहेब करचे जिल्हा सातारा यांना दर कमी करणे बाबत या कार्यालयाकडिल दिनांक ५/९/२०१५ चे पत्रान्वये कळविले असता संबधित मक्तेदाराने दिनांक १८/९/२०१५ रोजी खुलासा केला आहे. संबधितानी स्वताची जी.सी.बी.मशिन स्टोन क्रशर मशिनरी असल्यामुळे कामाचा दर्जा चांगला ठेऊन (-२८.५५) टक्के कमी दराने काम करु शकत असलेचे पत्राने कळविले आहे. तरी रक्कम रुपये २०,००,८२८/- ही सर्वात कमी दराची निविदा असल्याने सदरची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शा.नि.क्रं.झेडपीए-२०१२/प्र.क्र./६८०/वित्त-९ मंत्रालय मुंबई दिनांक ३१ जानेवारी २०१३ अन्वये रक्कम रुपये २३,००,००१/- ते ३०,००,०००/- पर्यंतचे कामाच्या निविदा स्विकृतीचे अधिकार विषय समिती जिल्हा परिषद यांना आहेत. विषय समिती जिल्हा परिषद यांना असल्याने सदरची निविदा मंजुरी करणेत येत आहे.

सूचक :- मा.सौ.घाडगे सावित्रा मानाजी
अनुमोदक :- मा.सौ.राधाबाई दिनकर शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

ऐ.वे.विषय क्रं.४ :- कार्यकारी अभियंता बांधकाम/उत्तर साठी वाहने भाडेतत्वावर घेणे बाबत विचारविनिमय करणे.

ठराव क्रं. २२४ :- कार्यकारी अभिंता बांधकाम विभाग उत्तर व दक्षिण यांना देणेत आलेली वाहने निर्लेखित केलेली असलेने विकास कामांची पाहणी करणे अडचणीचे झाले आहे.तरी सदर दोन्ही विभागास भाडेतत्वावर वाहने घेणेसाठी असलेल्या दिनांक १० सप्टेबर २००१ च्या शासन निर्णयातील बाब ५ ड ला अधिन राहुन व कामावरील उपलब्ध असलेल्या ४ टक्के सादील मधुन त्याबाबतच्या असणा-या शासन नियमास अधिन राहुन वाहने भाडयाने घेणेचे बाबीस मान्यता देणेत येत आहे.

सूचक - :- मा.सौ.घाडगे सावित्रा मानाजी
अनुमोदक :- मा.सौ.सुरेखा महेंद्र पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

ऐ.वे.विषय क्रं ५:- जिल्हा वार्षिक योजनेतील विविध लेखाशिर्षाखालील विकास कामाच्या निविदेच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा प्राप्त होतात. त्यामधील बचत निधीच्या रकमा मधुन नविन कामे मंजुर करणे बाबत विचार विनिमय करणे.

ठराव कमांक :-२२५ जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडिल सर्व योजनेतील विविध लेखाशिर्षकाखालील विकास कामाच्या निविदा हया निविदेच्या दरापेक्षा कमी दराने प्राप्त होत असल्याने जिल्हा परिषदेस मंजुर अनुदान १०० टक्के खर्च होत नाही. निविदेतील काम पुर्ण झाल्यानंतर बचत होणा-या निधीतुन त्याच लेखाशिर्षाखाली मंजुर आराखडयामधील शिल्लक कामांना मंजूरी देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक -- मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र
अनुमोदक -- मा.सौ.राधाबाई दिनकर शिंदे

ठराव सर्वानुमते मंजुर

येणेप्रमाणे विचार विनिमय झालेनंतर मा.जि.प.सदस्य,श्री.भोसले राजु अनिल यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व सभा संपलेचे जाहिर केले.

सही/XXX
सचिव
बांधकाम समिती जि.प.सातारा

सही/XXX
सभापती
बांधकाम समिती जि.प.सातारा

**सत्य प्रत**

**सचिव**
**बांधकाम समिती जि.प.सातारा**